<u>माई आजीचा रेडिओ</u>



[१] माझी माई आजी आमच्या घराच्या जवळच राहते. त्यामुळे माझी खूपच मजा असते. मी शाळेतून सरळ तिच्याकडेच जातो. ती मला काहीतरी खाऊ देते. कधीकधी मी रात्रीच्या जेवणापर्यंत तिथे थांबतो.

[२] माई आजीच्या शेजारी माझे मित्र राहतात. कधीकधी खाऊ खाऊन झाल्यावर मी त्यांच्याकडे खेळायला जातो. इतर वेळेला मी आजीला तिच्या कामांमध्ये मदत करतो.

[३] मी तिच्या बागेतले तण काढतो किंवा ओसरी झाडतो. ती मला तिच्या लहानपणीच्या गोष्टी सांगते. तिला आणि तिच्या भावंडांना खूप खेळणी नव्हती, पण तरीसुद्धा ते खूप मजा करायचे. ते लंगडी, शिवाशिवी, लगोरी खेळायचे. रात्री काजवे पकडायचे. उन्हाळ्यात ते सारे अंगणातच झोपायचे.

[४] जेव्हा माई आजी मला बागेतल्या कामात मदत करायला सांगते, तेव्हा मला माहिती असतं की नंतर मला एक गोष्ट ऐकायला मिळणार आहे. आजी झाडांना पाणी घालते. मी तण काढतो. मग आजी मला गोष्ट सांगते. अशीच एकदा आजीनी मला तिच्या जुन्या लाकडी रेडिओची गोष्ट सांगितली. खरं तर तो रेडिओ तिच्या आईचा होता.

[५] आजी म्हणते की पूर्वी लोक रेडिओच्या भोवती जमून कार्यक्रम ऐकत - जसे आता आपण टीव्ही बघतो ना, तसे. रेडिओवर कलाकार नाटकं वाचून दाखवत. संगीताचे कार्यक्रम असत. जगातल्या बातम्या सांगत. क्रिकेटच्या खेळाच्या बातम्या सांगत. मी खूप विचार करतो की टीव्ही न बघता नुसतच बसून ऐकायला कसं वाटत असेल? मी माई आजीला विचारतो, "रेडिओ ऐकायला खूप कंटाळा यायचा का?" ती तर म्हणते, "छे, खूपच मजा यायची." लोकांना रेडिओ इतका आवडायचा, की टीव्ही लोकप्रिय व्हायला खूपच काळ लागला.

[६] मी तिला विचारतो की आपण रेडिओ चालू करून ऐकायचा का? आणि काय गम्मत, रेडिओचे बटण दाबताच तो चालू देखील होतो. आजीच्या आवडत्या स्टेशनवरची गाणी सुरु होतात. मी आणि माई आजी हसायला लागतो.

~ त्रिवेणी मराठी शाळा (सिनसिनाटी, ओहायो)

ही गोष्ट एक मुलगा सांगतो आहे का मुलगी? तुम्हाला पहिल्यांदा कोणत्या वाक्यामुळे समजले? जर ही गोष्ट मुलीनी सांगितली असती, तर ते वाक्य कसे झाले असते?

______________________________

______________________________

माई आजी लहानपणी कायकाय मजा करायची?

______________________________

______________________________

मुलाला त्याच्या आजीबद्दल काय वाटते? तुमच्या उत्तरासाठी उताऱ्यातून उदाहरणे द्या.

______________________________

______________________________

______________________________

पाचव्या परिच्छेदाची मुख्य कल्पना काय आहे?

______________________________

______________________________

खालील शब्दांच्या अर्थात फरक आहे. त्यांचा वाक्यात उपयोग करा.

कधी, कधीकधी

अश्याच आणखी दोन जोड्या शोधा.

तुमच्या आजीला तिच्या लहानपणीच्या रेडिओच्या आठवणी विचारा.